परिपत्रक क्रमांक : ३८
(जनरल विभाग)

रयत शिक्षण संस्था, सातारा
दिनांक :- २०/०१/२०२४

सर्व महाविद्यालये ,
रयत शिक्षण संस्था,

यांना ...

विषय : **प्राचार्य एम.एम.स्वामी पुरस्कृत बॅरिस्टर पी.जी.पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार व श्री सिद्धाश्रम पुरस्कृत प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविणेबाबत.**

ती. कर्मवीर अण्णा, बॅरि.पी.जी.पाटील व प्राचार्या सौ सुमतिबाई पाटील यांचे विचार समोर ठेवून शिक्षकांनी कार्य करावे यासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना प्रेरणा मिळावी म्हणून प्रा.सौ.पुष्पा विजय जंगम यांनी प्राध्यापकांसाठी प्राचार्य एम.एम.स्वामी पुरस्कृत, बॅरि.पी.जी.पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यासाठी संस्थेकडे रु.१,००,१०१/- (रु. एक लाख एकशे एक) तसेच संस्थेचे माजी सचिव प्रिं.एम.एम.स्वामी यांनी प्राध्यापिकेसाठी श्री सिध्दाश्रम पुरस्कृत प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यासाठी रु.१,००,०००/-(रु.एक लाख) कायम ठेव ठेवलेली आहे. या दोन्ही ठेवींच्या व्याजातून संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील दरवर्षी एका आदर्श प्राध्यापक व प्राध्यापिकेस वरील पुरस्कार दिले जातात. सदरचे पुरस्कार दि. २ जुलै २०२४ रोजी बॅरि.पी.जी.पाटील यांच्या स्मृतीदिनी दिले जाणार आहेत.

पुरस्कारासाठीचे निकष खालीलप्रमाणे

१. पुरस्कारासाठी महिला आणि पुरूष प्राध्यापक हा विद्यापीठ मान्यताप्राप्त नियमित पूर्णवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे, तो किमान पीएचडी अर्हताधारक असावा तसेच पुरस्कारासाठी पात्र होण्यासाठी संलग्न महाविद्यालयातील अध्यापनाचा किमान दहा वर्षाचा अनुभव असावा.
२. प्राध्यापकांनी आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी स्वत:च्या विषयासंबंधीचे संशोधन प्रकल्प, लेख, संशोधनपर लेख, ग्रंथलेखन, क्रमिक पुस्तकांचे लेखन, त्यांच्या विषयासंबंधीची व्याख्याने, चर्चासत्रे किंवा अधिवेशनात लेख सादरीकरण इत्यादी केलेले असावे.
३. महाविद्यालयाच्या परिसरातील व समाजातील लोकांच्या समस्यांची माहिती त्यांना असावी व त्या सोडविण्यासाठी यथाशक्ती सहभाग असावा.

पान नं. २ वर . . .

४. पुरस्कार विजेत्यांची निवड करताना त्यांचा संस्थेचा व महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमातील सक्रीय सहभागाचा प्राधान्याने विचार केला जाईल.

५. खालील सेवकांना पुरस्कार योजनेत भाग घेता येणार नाही.

अ) संस्थेचे घटनात्मक पदाधिकारी व प्राचार्य

ब) वर्तनाबद्दल संस्थेकडून ज्या सेवकास काही शिक्षा झाली आहे अथवा ज्यांच्या सेवा पुस्तकात गैरवर्तणूकीची नोंद झाली आहे.

६. पुरस्कारासाठी आवश्यक असलेल्या निकष व त्याकरीताच्या गुणांकनापैकी किमान ६० टक्के गुण प्राप्त असलेल्या शिक्षकांना सदर पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.

७. जे निकष दिलेले आहेत त्या निकषांना अनुसरूनच माहिती पाठवावी. वरील मुद्दे विचारात घेऊन सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात गुणांकन करून जास्तीत जास्त गुण असणा-या एक शिक्षक व एका शिक्षिकेचे नाव प्राचार्यांच्या योग्य त्या शिफारशीसह संस्थेकडे पाठवावेत.

वरील दोन्ही पुरस्कारासाठी आपल्या महाविद्यालयातील पात्र प्राध्यापक व प्राध्यापिका यांची माहिती सोबतच्या नमुना फॉर्ममध्ये भरून घेऊन आपल्यामार्फत दि. ०५/०३/२०२४ पर्यंत संस्था कार्यालयाकडे पाठवून द्यावी. सदर पत्रासोबत आपली शिफारस स्वतंत्र पत्राने पाठवून द्यावी त्यामध्ये संबंधितांचे काम, संस्थानिष्ठा, कृतज्ञता निधी कधी पासून व किती देतात. कर्मवीर निधी देतात काय ? संस्थेच्या आवाहनास प्रतिसाद देतात काय ? याबाबतचा आपला स्पष्ट अभिप्राय पाठवावा.

सचिव,

रयत शिक्षण संस्था, सातारा

टीप - सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून त्यावर त्यांच्या सह्या घ्याव्यात व त्याची प्रत ई- मेलद्वारे दि. ३१/०१/२०२४ पर्यंत कार्यालयाकडे पाठवून द्यावी.

सोबत - फॉर्म

/ Kachare madam/Swami Purskar /21/01/2024

## प्राचार्य एम.एम.स्वामी पुरस्कृत बॅरिस्टर पी.जी.पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार व श्री सिध्दाश्रम पुरस्कृत प्राचार्या सौ.सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार

१. शिक्षकाचे नाव -
२. फोन नंबर -
३. महाविद्यालयाचे नाव -
४. शैक्षणिक अर्हता -
५ अनुभव -

| | | संशोधन (जास्तीत जास्त ३० गुण ) | गुण | कार्यालयीन उपयोगासाठी |
|---|---|---|---|---|
| १ | अ. | **प्रकाशन (संशोधन जर्नल्स) १० गुण**<br>विद्यापीठ -१गुण ,राज्यस्तरीय-२ गुण, राष्ट्रीय-३ गुण,आंतरराष्ट्रीय -५ गुण | | |
| | ब. | **संशोधन प्रकल्प ५ गुण**<br>Minor research project – 2 , Major research project - 3<br>माहिती पाठविताना मंजुरी पत्र किंवा पत्रे व सर्टिफिकेट पाठवावे. | | |
| | क. | **संशोधन मार्गदर्शन १० गुण** (Ph.D-३ गुण प्रत्येकी, M.Phil-१ गुण प्रत्येकी) (Declaration certificate जोडणे आवश्यक) | | |
| | ड. | **क्रमिक पुस्तके / समीक्षण / सर्जनात्मक / संशोधन पुस्तके - गुण - ५**<br>( संपादित साहित्यास गुणदान केले जाणार नाही.)<br>क्रमिक पुस्तके - २ गुण (सहलेखकांच्या संख्येने भागून गुणांकन करावे )<br>समीक्षण / सर्जनात्मक / संशोधन पुस्तके - ३ गुण | | |
| २ | | **अध्ययन, अध्यापन मूल्यमापन (४० गुण )** | | |
| | अ. | **शिष्यवृत्ती / पुरस्कार - १० गुण** संबंधित शिक्षकांनी प्राप्त केलेली शिष्यवृत्ती (Fellowship/Prize) विद्यापीठीय-२,राज्यस्तरीय-३,राष्ट्रीय-४ ,आंतरराष्ट्रीय -५ | | |
| | ब. | **सादरीकरण व आयोजन (१० गुण)** अधिवेशन, चर्चासत्र व कार्यशाळा सादरीकरण -१, सभा अध्यक्ष-१, बीजभाषण-२, निमंत्रित व्याख्याता-२, समन्वयक -२ | | |
| | क. | **व्यावसायिक व विषय संबंधी संघटनेतील योगदान - (१० गुण)** कार्यकारिणी सदस्य १,सचिव २, कोषाध्यक्ष २, कार्यकारिणी पदाधिकारी ३ | | |
| | ड. | **मूल्यमापन (१० गुण)** M.Phil. referee- २ गुण प्रत्येकी, Ph.D.referee- ३ गुण प्रत्येकी, संशोधनपर लेखांचे परीक्षण २ | | |
| ३ | | **विस्तार कार्य ( प्राध्यापकासाठी २० गुण व प्राध्यापिकेसाठी ३० गुण )** | | |
| | अ. | **करिअर विषयक (प्राध्यापिकासाठी १० गुण व प्राध्यापिकेसाठी १५ गुण )** (प्रत्येकी २ गुण) विषय प्रविण्यासाठी मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन, नोकरी विषय मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, समुपदेशन इत्यादी | | |
| | ब. | **समाजाभिमुख उपक्रम (प्राध्यापिकासाठी १० गुण व प्राध्यापिकेसाठी १५ गुण )** (प्रत्येकी २ गुण) राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी व सदस्य सामाजिक कार्यातील सहभाग, व्यसनमुक्ती, साहित्य चळवळ,पर्यावरण मुक्ती, आपत्ती व्यवस्थापन, तंटामुक्ती, लेक वाचवा इत्यादी | | |
| ४ | | **स्वावलंबन / कमवा व शिका योजनेतून उच्च शिक्षण (प्राध्यापकांसाठी १० गुण )** कागदोपत्री पुरावा जोडणे आवश्यक | | |
| | | **एकूण गुण १००** | | |

**टिप** -
१. प्रस्ताव साध्या बांधणी स्वरूपात सादर करावा (स्पायरल)
२. प्रस्तावाच्या प्रत्येक पानावर अनुक्रमांक घालावे. तसेच अनुक्रमणिकेत देखील पृष्ठ क्रमांक नमूद करावे.
३. प्राचार्यांनी प्रस्ताव पाठवितेवेळी वर्तनाबाबतचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. प्रस्ताव पाठवितेवेळी संबंधिशिक्षकाने सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती पाठवाव्यात.